**ठळक बातम्या**

- भाजपा विधीमंडळ पक्षनेता निवडीसाठी केंद्रीय निरीक्षक म्हणून भाजपाकडून विजय रुपाणी आणि निर्मला सीतारामन यांची नियुक्ती / येत्या बुधवारी भाजपा विधिमंडळ पक्षाची बैठक

- अदानी लाचखोरी, संभल हिंसाचार आणि इतर मुद्द्यांवरुन संसदेत आजही गदारोळ, दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या मुंबई दौऱ्यावर

**आणि**

- येत्या दोन दिवसात, राज्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता

**<><><><><>**

राज्यात सरकारस्थापनेच्या दृष्टीनं, भाजपा विधीमंडळ पक्षनेता निवडीसाठी केंद्रीय निरीक्षक म्हणून भाजपाच्या संसदीय मंडळानं गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री  निर्मला सीतारामन यांची नेमणूक केली आहे.

भारतीय जनता पार्टीच्या विधिमंडळ पक्षाची बैठक येत्या ४ डिसेंबरला होणार असून त्यानंतर मुख्यमंत्रीपदासाठी औपचारिक घोषणा होण्याची शक्यता आहे.

काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आजच्या सर्व बैठका आणि कार्यक्रम रद्द केल्याचं सूत्रांनी सांगितलं.

दरम्यान शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांना उपमुख्यमंत्रिपद मिळणार असल्याचं वृत्त निराधार असल्याचं श्रीकांत शिंदे यांनी समाजमाध्यमातून स्पष्ट केलं आहे. यापूर्वी आपल्याला केंद्रात मंत्रिपदाचा प्रस्ताव मिळाला होता मात्र आपण तो नाकारला. आपण यापुढं पक्ष संघटना आणि लोकसभा मतदार संघावर लक्ष केंद्रीत

करणार असून राज्यातल्या कोणत्याही मंत्रिपदात आपल्याला रस नाही असं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीमध्ये पोस्टल मतदान आणि मतदान यंत्रातलं मतदान यात तफावत आहे असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार वरुण सरदेसाई यांनी केला आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते.

यावेळी त्यांनी काही मतदारसंघातल्या उमेदवारांना मिळालेल्या मतदानाची आकडेवारी उदाहरणादाखल समोर मांडली. ही माहिती निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळावरून घेतल्याचं सरदेसाई यावेळी म्हणाले.

<><><><><>

अदानी समूहाचं कथित लाचखोरी प्रकरण तसंच संभल हिंसाचार यांच्यासह विविध मुद्द्यांवर विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे आज सलग पाचव्या दिवशीही संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

लोकसभेत आज कामकाज सुरू झाल्यानंतर काँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक आणि इतर पक्षाच्या नेत्यांनी घोषणाबाजी करायला सुरुवात केली. सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास घ्यायचा प्रयत्न केला. दरम्यान विरोधकांनी आपल्या मुद्द्यांवरून सभापतींना स्थगन प्रस्ताव सादर केला, तो बिर्ला यांनी फेटाळून लावला. सभापतींनी वारंवार चर्चेची विनंती करूनही गदारोळ सुरूच राहिल्याने लोकसभेचं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब झालं.

राज्यसभेतही विरोधकांनी अदानी, संभल तसंच मणिपूर या विषयांवरून स्थगन प्रस्ताव सादर केला. मात्र, अध्यक्ष जगदीप धनखड यांनी तो फेटाळला.

त्यानंतर विरोधकांचा गदारोळ कायम राहिल्यानं राज्यसभेचं कामकाजही दिवसभरासाठी तहकूब झालं.

<><><><><>

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सुरू असलेला गोंधळ थांबवण्यासाठी लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी आज दुपारी संसद भवनात विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांची बैठक घेतली. यावेळी बिर्ला यांनी सर्व नेत्यांना सभागृहाचं कामकाज सुरळीतपणे चालवण्याची विनंती केली. त्यावर सर्व नेत्यांनीही यासाठी सहमती दर्शवली. या बैठकीला काँग्रेसचे गौरव गोगोई, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, टीडीपीचे लवू श्रीकृष्ण देवरायालू, डीएमकेचे टी. आर. बालू, राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे, सपाचे धर्मेंद्र यादव, जदयूचे दिलेश्वर कामैत, राजदचे अभय कुशवाह, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अरविंद सावंत उपस्थित होते.

<><><><><>

इयत्ता पाचवी आणि आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये ९ फेब्रुवारी या एकाच दिवशी पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी शाळा नोंदणी आणि विद्यार्थी ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी १७ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यात वाढ करण्यात आली असून विद्यार्थ्यांना आता विलंब शुल्क, अतिविलंब शुल्क आणि अति विशेष विलंब शुल्कासह ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज भरता येणार असल्याचं राज्य परीक्षा परिषदेनं प्रसिद्ध केलेल्या निवेदनात सांगण्यात आलं आहे.

<><><><><>

उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या शतकमहोत्सवी समारंभाला ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते शतकमहोत्सवी स्तंभाचं उद्घाटन होईल. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान हेदेखील या कार्यक्रमाला संबोधित करतील. संस्थेच्या शतकमहोत्सवी वर्षाचं औचित्य साधून 'अमृतकाळात कापसावरची उत्पादनानंतरची प्रक्रिया' या विषयावरच्या परिसंवादाचं आयोजनही करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

जागतिक एड्स दिनानिमित्त राज्यात विविध ठिकाणी काल आणि आज अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

**हिंगोलीत** यानिमित्त आज जिल्हा सामान्य रुग्णालय आणि शासकीय परिचारिका प्रशिक्षण केंद्रानं जनजागृती काढली. हिंगोलीच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी या रॅलीला हिरवा झेंडा दाखवला. उपस्थितांना या कार्यक्रमात एड्स नियंत्रणाबाबत शपथ देण्यात आली. तर शहरातल्या गांधी चौकात प्रतीकात्मक मानवी साखळी तयार करून एड्स नियंत्रणाबाबत माहिती देण्यात आली.

**मुंबईत** एच आय व्ही संसर्ग झालेल्या मुलांना आनंदाचे काही क्षण घालवता यावेत या उद्देशानं काल जिल्हा एड्स संस्थेनं आनंद मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्यात  मुलांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. तर जगाची सफर या कार्यक्रमात माहिती आणि मनोरंजनातून या मुलांना विविध देशांची सफर घडवण्यात आली.

**<><><><><>**

पुरुष हॉकी कनिष्ठ आशिया कप स्पर्धेत भारत आणि मलेशिया यांच्यात उद्या उपांत्य फेरीचा सामना होणार आहे. ओमानमध्ये मस्कत इथं ओमान स्टेडियमवर

संध्याकाळी साडे आठ वाजता  सामन्याला सुरुवात होईल. उपांत्य फेरीतला दुसरा सामना पाकिस्तान आणि जपान यांच्यात उद्या होणार आहे. तर या स्पर्धेतला अंतिम सामना ४ डिसेंबर रोजी होईल.

काल झालेल्या सामन्यात भारतानं दक्षिण कोरियाचा ८-१ असा पराभव केला. यात अर्शदीप सिंगने हॅटट्रिक नोंदवली. तर अरैजीत सिंग हुंदल याने भारतासाठी दोन गोल केले.

**<><><><><>**

१९ वर्षाखालील आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज अ-गटात भारताने जपानचा २११ धावांनी पराभव केला. संयुक्त अरब अमिरातीतल्या शारजाह स्टेडीयमवर झालेल्या या सामन्यात जपानने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. मात्र त्यानंतर भारताने विजयासाठी दिलेलं ३४० धावांचं उद्दिष्ट गाठताना जपानचा डाव १२९ धावांवर आटोपला. अ -गटातल्या दुसऱ्या सामन्यात पाकिस्तानने संयुक्त अरब अमिरातींच्या संघाला ६० धावांनी पराभूत केलं.

**<><><><><>**

भारतीय ऑलिपिंक संघटनेनं २०३६मध्ये ऑलिम्पिक खेळांच्या यजमानपदासाठी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समितीशी बोलणी सुरू केली आहेत. गेल्या ऑक्टोबर महिन्यात या संबंधीचं पत्र जारी केलं आहे, अशी माहिती युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी आज लोकसभेत लेखी उत्तरात दिली.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ४४५ अंकांची वाढ झाली, आणि तो ८० हजार २४८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १४५ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार २७६ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या किनारपट्टीवर सीगल पक्ष्यांचं आगमन झालं आहे. दरवर्षी थंडीचा हंगाम सुरु झाल्यावर युरोपातून हजारो किलोमीटरचा प्रवास करून २ ते ३ महिने हे पक्षी मुक्कामी येतात.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात, राज्यातल्या सर्व विभागांमधे तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. सर्वात कमी किमान तापमान ब्रम्हपुरी इथं १४ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली  आहे. या काळात कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.

<><><><><>

दक्षिण भारतात आलेल्या फेंगल वादळाचा परिणाम म्हणून सिंधुदुर्ग जिल्ह्यात येत्या शुक्रवारपर्यंत वादळी वारे आणि मेघगर्जनेसह हलका ते माध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. या काळात ३० ते ४० किलोमीटर वेगानं वारे वाहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

//<><><><><>//